# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ११३–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. बाबासो धोडाप्पा जाधव,<br>मु. पो. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

## महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग

(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. बाबासो धोडाप्पा जाधव, मु. पो. शेड्याळ, ता. जत, जि. सांगली यांनी आपली शेती गट क्र. १२८ मध्ये शेतीपंपासाठी विद्युत पुरवठा मिळावा यासाठी वि.प.कडे दि. १३.११.२००६ रोजी अर्ज करुन रु. ६८९०/– पावती क्र. ००५५३२५ नुसार चलन भरले. त्यानंतर दि. २६.१२.२००७ रोजी चाचणी अहवाल दिला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्याला अद्याप विद्युत पुरवठा मिळाला नाही. अशा रकमा आता विद्युत पुरवठा देतांना वसूल करणे बेकायदेशीर आहे.

मा. राज्य वीज नियामक आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे वितरण वाहिनीचा विस्तार हा वितरण कंपनीने करावयाचा असलेने ॲडिशनल सी.आर.ए. रु. १८००/– व टर्मीनल पोलचे रु. १३९०/– व कपॅसिटरचे रु. १००/– या रकमा आजघडीला जादा वसूल झाल्या आहेत. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली येथे रितसर तक्रार क्र. ७५० दि. २७.१.२०१० रोजी दाखल केली. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ५५५९ दि. ७.५.२०१० रोजी पारित केले. सदरच्या आदेशाच्या नाराजीने प्रस्तुतचे अपील मंचासमोर नमुना अ मध्ये दि. ४.६.२०१० रोजी प्रतिनिधीमार्फत दाखल करण्यात आले आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २९.६.२०१० चे लेखी अहवालात श्री. बाबासो धोंडाप्पा जाधव, रा. शेड्याळ यांचा शेतीपंपाच्या वीज पुरवठ्यासाठी दि. १३.११.२००६ रोजी अर्ज आल्याचे मान्य केले व त्यांनी अनामत रक्कम रु. ६८९०/– भरलेली आहे. त्यांना ०.४२ कि.मी.ची लघुदाब वाहिनी लागते. प्रस्तावीत लागणाऱ्या वाहिनीचा विस्तार झाल्यावर कनेक्शन देण्यात येईल. मा.विद्युत नियामक आयोगाच्या शेड्यूल ऑफ चार्जेस तक्रारदारास एस.डी. रु.२५००/– व सी.आर.ए. रु. २५०० /– चलन स्वरुपात भरणे आवश्यक होते, परंतु सदर ग्राहकाकडून चलन स्वरुपात रु. ६८९०/– भरुन घेण्यात आलेले आहेत. जादा भरलेले रु. १८९०/–तक्रारदारास वीज जोडणी दिल्यानंतर येणाऱ्या पहिल्या बिलातून समायोजित करुन देण्यात येईल.

प्रस्तुतची तक्रार मंचासमोर दि. २७.७.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, तक्रारदार प्रतिनिधी श्री. खापरे उपस्थित. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता संख उप विभाग, श्री. मैंलापूर व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. श्री. खापरे यांनी असे प्रतिपादन केले की, तक्रारदार यांनी दि. २६.१२.२००७ ला चाचणी अहवाल दिला आहे. तक्रारदार यांनी विद्युत पुरवठा संहिता अधिनियमाचे पालन केले आहे. त्यांचे म्हणण्यानुसार वि.प.चे कोडमधील कलम १३.१ नुसार चाचणी अहवालाची तपासणी वि.प.ने करणे जरुरी होते. तेव्हा जादा भरुन घेण्यात आलेले रु. १८९०/– व्याजासह परत मिळावेत. कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी केली आहे. वि.प.तर्फे श्री. मैंलापुरे यांनी तक्रारदाराचा चाचणी अहवाल जुना आहे. तक्रारदाराचं जादा भरुन घेतलेले रु. १८९०/– बिलातून परत देण्यात तयारी दर्शविली, परंतु कांहीच कार्यवाही केली नाही किंवा त्याबद्दल कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. सदर जादा रु. १८९०/– वेगळ्या वेगळ्या हेडखाली परतावा देण्याची हमी श्री. मैंलापुरे यांनी घेतली आहे. मंचासमोर वि.प.च्या अधिकाऱ्यांनी २ महिन्यांत वीज जोडणी देतो असे सांगितले त्यानंतर दुसऱ्या दिवशी दि. २८.७.२०१० ला कार्यकारी अभियंता श्री. भोसले व मैंलापुरे, प्रभारी सहाय्यक अभियंता यांच्या सहीने दिलेल्या अर्जात तक्रारदारास ॲडीशनल सी.आर.ए. म्हणून जादा रु. १४००/– भरावे लागतात म्हणून त्यांनी भरलेल्या रकमेमध्येच एस.डी. रु. २५००/– व सी.आर.ए. रु. २५००/– कंपनीच्या नांवे घेवून उर्वरित रक्कम रु. १८९०/– ग्राहकास वीज कनेक्शन दिल्यानंतर येणाऱ्या पहिल्या बिलातून वजावट करुन देतो तसेच ग्राहकास १ महिन्यात विद्युत पुरवठा जोडून चालू करुन देतो असे लेखी दिले आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दे निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) तक्रारदार यांनी विनंती केल्याप्रमाणे रु. ३२९०/– वि.प.कडून परतावा व्याजासह मिळणेस तक्रारदार हक्कदार आहे काय ?

उत्तर : होय

२) तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी मंचासमोर मागणी केल्याप्रमाणे एस.ओ.पी. प्रमाणे भरपाई मिळणेस तक्रारदार हक्कदार आहे काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे –

कारणमिमांसा

अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचे आदेशानुसार ॲडिशनल सी.आर.ए. , एंड पोल व कपॅसिटरचे पैंसे बिलातून परत देण्याचे आदेश दिले आहेत, तरी तक्रारदाराने मंचाकडे धाव घेतली. तक्रारदार प्रतिनिधी यांनी विद्युत कायदा २००३ कलम ६२.६ नुसार व्याजाची मागणी केली आहे तसेच मंचासमोर प्रतिपादन केल्याप्रमाणे विद्युत पुरवठा मिळावा याच्यामध्येच भरपाई मिळावी ही मागणी कव्हर होत आहे असे म्हटले आहे. वि.प.ने सदरची रक्कम परत देण्याची तयारी दर्शविली आहे. वि.प.ने आपल्या लेखी अहवालात शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे रक्कम परत केलेस तक्रारदारांचे नांवे रु. ३६००/– राहतात त्यानुसार त्यांना ॲडिशन सी.आर.ए. रु. १४००/– भरावे लागतील त्यामुळे उर्वरित रक्कम रु. १८९०/– परत देण्याची तयारी दर्शविली आहे.

तक्रारदार यांनी प्रस्तुत प्रकरणात कलम ६२.६ विद्युत कायदा २००३ नुसार बँक रेटने व्याज मिळावे अशी मागणी केली आहे. सब सेक्शन ६ प्रमाणे

If any Licensee or a Generating Company recovers a price or charge exceeding the tariff determined under this Section, the excess amount shall be recoverable by the person who has paid such price or charge along with interest equivalent to the bank rate without prejudice to any other liability incurred by the Licensee.

तक्रारदार यांनी दि. १३.११.२००६ रोजी पैंसे भरलेले आहेत व व चाचणी अहवाल २६.१२.२००७ रोजी दिला आहे. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचे शेड्यूल ऑफ चार्जेस प्रमाणे वि.प.ने जी जादा रक्कम भरुन घेतली आहे त्याबद्दल वि.प.ने कसलाही खुलासा केलेला नाही, केवळ रक्कम परत देण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे सदर रकमेवर व्याज देण्याची मागणी फेटाळता येणार नाही. त्यामुळे तक्रारदार यांस वि.प.ने रु. १८९०/– वर १२% व्याज सदर रक्कम भरल्यापासून पहिल्या बिलींग सायकलमध्ये समायोजित करेपर्यंत देण्यात यावे. श्री. खापरे यांनी मंचासमोर तक्रारदारास नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली आहे, परंतु अनुसूचि अ मध्ये तक्रारदार यांनी कृती मानकाप्रमाणे भरपाई द्यावी अशी स्पष्टपणे मागणी केलेली नाही. श्री. खापरे यांचे म्हणण्यानुसार विद्युत पुरवठा मिळावा या विनंतीत भरपाईची मागणी समाविष्ट होते, परंतु हे म्हणणे ग्राह्य धरता येणार नाही. तक्रारदाराने अंतर्गत कक्षाकडे दि. २७.१.२०१० ला क्ष फॉर्ममध्ये केलेल्या तक्रारीमध्ये अशा प्रकारची मागणी केलेली नाही. एस.ओ.पी. प्रमाणे मुदतीत वीज कनेक्शन मिळावे व जादा अंतराचे, एंड पोल व कपॅसिटर टेस्टिंग फीचे पैंसे परत मिळावेत अशी मागणी केली आहे. वि.प.ने तक्रारदार यांस १ महिन्यात विद्युत पुरवठा जोडून चालू करुन देण्याची लेखी हमी मंचासमोर दिली आहे.

**तसेच वि.प.ने आपल्या लेखी म्हणण्यात नोंदविल्याप्रमाणे सुरक्षा ठेव ( सेक्युरिटी डिपॉझीट ) रु.२५००/– व सी.आर.ए. रु. २५००/– जमा केल्याची नोंद करुन तशी पावतीत सुधारणा करावी. आदेश खालील प्रमाणे पारित करण्यात येत आहे.**

## आदेश

१) तक्रार अंशत: मंजूर करण्यात येत आहे.
२) वितरण कंपनीने तक्रारदारास रु. १८९०/– ही रक्कम भरल्यापासून पहिल्या बिलींग सायकलमध्ये समायोजित करेपर्यंत सदर रकमेवर १२% व्याज द्यावे.
३) तक्रारदाराची मागणी कृती मानकातील तरतुदीनुसार भरपाई द्यावी फेटाळण्यात येत आहे.
४) वि.प.ने मंचासमोर लेखी हमी दिल्याप्रमाणे तक्रारदार यांस १ महिन्यात वीज जोडणी करुन द्यावी व या बाबतचा अहवाल मंचाकडे द्यावा.
५) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.
६) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष